**सोलापूर महानगरपालिका सोलापूर**
पत्ता-इंद्रभुवन, पुण्यश्लोक अप्पासाहेब वारद पथ, रेल्वेलाईन्स, सोलापूर ४१३००१
नगर अभियंता कार्यालय, शहर सुधारणा विभाग

जा.क्र.नगर अभियंता / शहर सुधारणा विभाग / 2025/ दिनांक - / /

## सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025

## ई - निविदा सुचना क्रमांक

निवडणूक निर्णय अधिकारी क्र.06 यांचे अखत्यारीत असलेले ठिकाणी मंडप, फर्निचर व इतर अनुषंगिक साहित्य भाडे तत्वावर पुरवठा बाबत ई निविदा सुचना

आगामी सोलापूर महानगरपालिका निवडणूक 2025 च्या अनुषंगाने संपूर्ण प्रक्रिये दरम्यान निवडणूक निर्णय अधिकारी क्र.06 आदेश देतील त्या ठिकाणी मंडप, फर्निचर व इतर अनुषंगिक साहित्य भाडे तत्वावर पुरवठा व इतर साहित्य पुरवठा करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहित नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात येत आहे. सदर ई - निविदा www.solapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.

कामाचे नाव : सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या संपूर्ण प्रक्रिये दरम्यान निवडणूक निर्णय अधिकारी क्र.06 च्या क्षेत्रात मंडप, फर्निचरव इतर अनुषंगिक साहित्य भाडे तत्वावर पुरवठा इतर अनुषंगिक साहित्य पुरवठा करणेबाबत.

| | |
|---|---|
| निविदा अंदाजीत रक्कम | रू.24,50,000/- (अक्षरी र.रू.चोवीस लाख पन्नास हजार) |
| ई निविदा फार्म शुल्क | रू.1200/- (विना परतावा) |
| इसारा / बयाणा (EMD) रक्कम | रू.24,500 /- |
| सुरक्षा अनामत रक्कम | रू.73,500 /- |
| ई - निविदा प्रसिध्दीचा दिनांक व वेळ | दि१८/१२/2025 स/दु. 03.00 वाजता |
| ई - निविदा भरण्याचा कालावधी | दि.१९/१२/2025 सकाळी 11.00 पासून ते<br>दि.१९/१२/2025 दुपारी 17.00 पर्यंत |
| ई - निविदा अंतिम दिनांक व वेळ | दि.१९/१२/2025 स/दु. 10.00 वाजता |
| ई - निविदा लिफाफा क्रमांक -1 (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि.२०/१२/2025 रोजी स.10.00 वाजता किंवा तदनंतर |
| ई - निविदा उघडण्याचे ठिकाण | सोलापूर महानगरपालिका,सोलापूर |
| संपर्क अधिकारी | नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका,सोलापूर |

निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी -

1 सदर निविदेच्या अटी व शर्ती www.solapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा /बयाणा रक्कम www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करुन लिफाफा-I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन लिफाफा-II मध्ये अपलोड करावा.)

2 प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी सोलापूर यांनी स्वत: राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

3 सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.

4 निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारांनी क्लास III डिजीटल सिग्रेचर व सदर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वत: नाव नोंदणी करुन घ्यावी.

5 सदर अटीं व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती व इतर कागदपत्रे ई-निविदेत स्कॅन करुन PDF फॉरमॅटमध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.

Digitally signed by
SANDIP BHIMASHANKAR KARANJE
Date: 18-12-2025 18:37:22

(संदीप कारंजे )

अतिरिक्त आयुक्त - 2

सोलापूर महानगरपालिका

## मंडप,  फर्निचर,  व इतर साहित्य पुरवठा बाबत ई - निविदा सुचना अटी व शर्ती

आगामी सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 निवडणूकीच्या संपूर्ण प्रक्रिये दरम्यान मंडप, फर्निचर, व इतर अनुषंगिक साहित्य भाडेतत्वावर पुरवठा करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहित नमुन्यातील निविदा ई - निविदा प्रणालीव्दारे मागविण्यात येत आहे. सदर ई - निविदा www.solapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

### I) लिफाफा क्र.1(तांत्रिक लिफाफा)

लिफाफा क्र.1(तांत्रिक लिफाफा) मध्ये निविदा,निविदा अर्जासह खालील सर्व कागदपत्रे स्वसाक्षंाकिंतसादर करणे आवश्यक आहे.(तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करुन www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर लिफाफा I मध्ये अपलोड करावेत.

| | |
|---|---|
| 01. | निविदा अर्ज फी व इसारा रक्कम www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर Online Payment पध्दतीने भरावी. सदर रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही. सदर Online Payment ची पावती स्कॅन करून लिफाफा क्रमांक 1 सोबत जमा करावी. इसारा रक्कम भरलेली नसल्यास निविदेचा विचार करणेत येणार नाही. |
| 02. | ई- निविदा धारकाचे संपुर्ण नाव, पत्ता, दुरध्वनी क्रमांक व ईमेल आयडी नमुद करून सादर करावे |
| 03. | इसारा रक्कम भरण्यातून सूट असल्यास तसे दर्शविणारे संबधित विभागाचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. |
| 04. | महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम 1948 नुसार नोंदणी प्रमाणपत्र (नुतनीकरणासह) |
| 05. | आयकर पॅन कार्ड, आधार कार्ड प्रत |
| 06. | आयकर विवरणपत्राची ( मागील लगतच्या 1 वर्षाची) प्रत |
| 07. | मागील वर्षाचे व्यवसाय कर भरलेबाबत प्रमाणपत्र / चलन प्रत (Profession Tax) |
| 08. | GST नोंदणी प्रमाणपत्र |
| 09. | चालु वर्षाचा GST भरलेबाबतचेविवरणपत्र (GSTR-3B) |
| 10. | काळ्या यादीत नाव समाविष्ठ नसल्याबाबतचे स्वघोषणापत्र. (सोबत जोडलेल्या नमुन्यात र.रू. 100 च्या स्टॅम्प पेपरवर असावे. |
| 11. | अटी व शर्ती मान्य असलेबाबत प्रतिज्ञापत्र (100 रूपयेच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र) |
| 12. | निवडणूक विषयक सदर कामकाजाचे एक किंवा अधिक वेळा समाधानकारक काम पुर्ण केल्याचा **अनुभव असणे** आवश्यक आहे.  तसेच शासकीय /निमशासकीय /केंद्र शासकीय कार्यालयांना सदर निविदेमध्ये नमुद साहित्य भाडे तत्वावर पुरवठा केल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. |
| 13. | मागील पाच वर्षाचे (सन 2020-21, 2021-22, 2022-23, 2023-24 व 2024-25) या आर्थिक वर्षातील उलाढाल प्रमाणपत्र, तथापि सन 2020-21 व सन 2021-22 या आर्थिक वर्षातील कोविड 19 च्या प्रादुर्भावाचा विचार करून मागील पाच वर्षापैकी कोणत्याही तीन वर्षाची सरासरी उलाढाल ही निविदा मुल्याच्या किमान 30% (तीस टक्के) असणे अनिवार्य आहे. तसे सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. |
| 14. | निविदेतील कामासाठी स्वत:ची यंत्रसामुग्री, मनुष्यबळ असल्याचा तपशिल नमुद करणे आवश्यक आहे. |

| | |
|---|---|
| 15. | निविदाधारक यांनी कोणत्याही राजकीय पक्षाचे पद भुषविले नसल्याबाबत सदस्थितीत कोणत्याही राजकीय पक्षाचा पदाधिकारी नसल्याबाबत व त्यांचे विरूध्द कोणताही फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल अथवा प्रलंबित नसल्याबाबत 100 रूपयेच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र (कार्यकारी दंडाधिकारी किंवा नोटरी) |
| 16. | निविदा भरलेल्या मक्तेदारांपैकी स्थानिकांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल याची नोंद घ्यावी. |
| 17. | निविदेसोबत सादर केलेल्या सर्व कागदपत्रांच्या व नोंदणी प्रमाणपत्रांच्या प्रती स्वसाक्षांकीत केलेल्या असल्या पाहिजे. |
| | **महत्वाचे :-** अट क्र.1 ते 17 मध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांपैकी एक जरी दस्तऐवज उपलब्ध केले नसल्यास निविदा अग्राह्य /अपात्र समजण्यात येऊन निविदेचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येणार नाही. **(वरील सर्व कागदपत्रे सलग जोडणे आवश्यक आहे.)** |

II) **निविदेतील मंडप, फर्निचर व इतर अनुषंगिक साहित्य पुरविणेकामी इतर अटी व शर्ती**

| | |
|---|---|
| 1. | वरील कामाचीसंपूर्ण माहिती www.solapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. |
| 2. | उपरोक्त कागदपत्रे सादर करण्यास कोणतेही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही. |
| 3. | लिफाफाक्र. 01 चीतपासणीकेल्यांनतर पात्र कंत्राटदार (निविदाधारक) यांचा लिफाफाक्र. 02 उघडण्यात येईल. |
| 4. | ठेकेदारासकोणत्याही प्रकारचे अग्रीम (ॲडव्हान्स) दिला जाणार नाही. |
| 5. | निविदाधारकाने पुरविलेल्या साहित्याची देयके निवडणूक प्रक्रिया पुर्ण होताच एका महिन्याच्या आत सादरकरणे आवश्यक आहे. देयका बरोबर साहित्य पुरविलेबाबत संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी/सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी / सक्षम अधिकारी / संबंधित ठिकाणी नियुक्त नोडल अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादरकरणे बंधनकारक राहिल व देयकासोबत निविदाधारकाला देण्यात आलेल्या पुरवठा आदेशाची प्रत सादरकरणे आवश्यक आहे.तसेच ठेकेदाराकडून देयके सादर करणेस उशीर झाल्यास व तद्नंतर कार्यालयाकडे अनुदान उपलब्ध नसल्यास त्यामुळे होणाऱ्या विलंबास कार्यालय जबाबदार नाही. |
| 6. | निविदाधारकाने सादरकेलेले देयकाची प्रतिपुर्ती अनुदान उपलब्धतेनुसार करण्यात येईल. त्याबाबत झालेल्या विलंबामुळे कोणत्याही प्रकारचे व्याज देयहोणार नाही किंवा निविदा धारकास कोणत्याही न्यायालयात याबाबत दावा दाखलकरता येणार नाही. |
| 7. | निविदाधारकांच्या देयकातून नियमानुसार आयकर व इतर शासकीय कर कपात करण्यात येईल. |
| 8. | कोणत्याही अटीच्या अर्थाबद्दल किंवा इतरकोणत्याही बाबतीत विवाद उद्भवल्यास मा.आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी सोलापूर यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील. तसेच निविदा संदर्भातील कोणत्याही प्रकारचा कायदेशीर वाद / न्यायालयीन वाद` उद्भवल्यास मा. जिल्हा न्यायालय सोलापूर यांच्या कार्यकक्षेमध्ये चालवण्यात येईल. |
| 9. | निविदाधारकाने दर नमुद करताना वस्तू व सेवासाठीची किंमत / खर्च व त्यासाठी भरावे लागणारे वेगवेगळे कर, वाहतूक खर्च हे स्वतंत्रपणे नमूद करुन त्याची एकूण होणारी रक्कम नमूद करावी. यशस्वी निविदाधारकास या कार्यालयाकडून कर माफी संदर्भातील कोणतेही प्रमाणपत्र देण्यात येणार नाही. तसेचमहाराष्ट्र शासन वित्त विभागयांचेकडील शासन परिपत्रक क्र. संकीर्ण 2018/प्र.क्र.144/2018/कोषा/प्र.शा.5 दिनांक 28/09/2022 अन्वये 2 % Income Tax TDS व 2 % GST TDS व इतर अनुज्ञेय कराची रक्कम देयकातून कपात करण्यात येईल याची नोंद घ्यावी. |
| 10. | सदरची निविदा अगर निविदेतील कोणताही भाग तसेच कोणत्याही अटी व शर्ती मध्ये कोणतीही कारणे न देता व कोणतीही पूर्व सुचना न देता रद्दकरण्याचा / राखून ठेवणेचा तसेच सुधारणा करणेचा हक्क मा.आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी, सोलापूर यांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे. |
| 11. | ई - निविदा संदर्भात केंद्र व राज्य शासनाद्वारे व निवडणूक आयोग यांचेकडून वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश, परिपत्रकामध्ये निर्देशित केलेल्या सर्व अटी व शर्ती व नियम लागू राहतील. |
| 12. | प्राप्त निविदा स्विकारणे अथवा नामंजूरकरणे, आवश्यक वाटल्यास काम विभागून देणे अथवा उपरोक्त अटीव शर्तीमध्ये बदल करण्याबाबतचा सर्व अधिकार मा.आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी,सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. |
| 13. | निविदेतील नमूदसाहित्याचा पुरवठ्यात/ संख्येत वाढ करणे, कमीकरणे याबाबतीत अंतिम निर्णय मा.आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांचा राहिल. |
| 14. | निविदा मंजूर झालेल्या निविदाधारकाने विहित कालावधीत काम पूर्ण न केल्यास त्याचा निवडणूक कामावर परिणाम होवू नये म्हणून अन्य पुरवठादाराकडून काम करून घेण्यात येईल. जास्तीचे खर्चाच्या फरकाची रक्कम संबंधित निविदाधारकाकडून वसूल करण्यात येईल. व सुरूवातीची जमा केलेली अनामत रक्कम सरकार जमा |

| | |
|---|---|
| | करण्यात येईल. तसेच निविदा किमतीच्या 5% पर्यंत अतिरिक्त दंड आकारण्यात येईल. |
| 15. | निविदा मंजूर झालेल्या निविदाधारकाने कामकरण्यास नकार दिल्यास-सदर निविदा अंतिम झालेल्या दराने दुसऱ्या क्रमांकाच्या निविदाधारकास देण्यात येईल व L1 ने सुरूवातीची जमा केलेली अनामत रक्कम सरकार जमा करण्यात येईलव संबंधित निविदा धारकास काळया यादीत समाविष्ट करण्यात येईल. |
| 16. | सदर निविदेचा कालावधी कार्यारंभ आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाचा राहिल. आवश्यकता वाटल्यास सदरचा कालावधी कमी किंवा जास्त करण्याचा अधिकार मा.आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी,सोलापूर यांना असेल. |
| 17. | लेखा परीक्षणातीलतपासणीमध्येतपासणी पथकाने शोधलेल्या मुद्दा(Audit Para) अंतर्गत रक्कमेचीसंपूर्ण वसूली ठेकेदारास देणे बंधनकारक राहील. |
| 18. | निविदाधारक यांना शासकीय / निमशासकीय कामकाजाच्या बाबतीत काळ्या यादीत घोषीतकेलेले असल्यास अशा निविदा धारक /संस्था यांनी निविदा भरू नये असे आढळून आल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही किंवा अशा निविदाधारकाचे निविदा मंजूर झालेली असल्यास रद्दकरण्यात येईल व तद्नंतर निविदा दरकमी असलेल्या निविदाधारकास निवडणूकीसाठी आवश्यकनिविदेतीलसाहित्यपुरविण्यासाठी निवड करण्यात येईल. |
| 19. | निविदासंबंधातील सर्व सुचना www.solapurcorporation.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्दकरणेत येईल. याबाबत व्यक्तिगत पुर्व सूचना देणेत येणार नाही याची नोंद घ्यावी. |
| 20. | साखळी पद्धतीने ई - निविदा भरल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित निविदाधारक यांना Black list करण्यात येईलव त्यांचेवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. |
| 21. | निविदाधारकाने सादर करावयाचे दरहे वास्तव, वस्तुनिष्ठ, बाजार किमतीनुसारसुसंगत असावेत. सादर केलेले दर हे वास्तव, वस्तुनिष्ठ, बाजार किमतीनुसार सुसंगत आढळून न आल्यास अशा निविदा केवळ L-1 येण्याकरीता टाकलेले दर असल्याचे गृहित धरून अपात्र करण्यात येईल. |
| 22. | प्रथम वेळेस निविदेस अल्प प्रतिसाद मिळाल्यास म्हणजेचकमीतकमी 2 ग्राह्य निविदा प्राप्त झाल्या नसल्यास तर पुन्हा 1 दिवसाकरीता मुदतवाढ देणेत येईल. दोन वेळेस मुदतवाढ दिल्यानंतरही प्रतिसाद प्राप्त न झालेस याबाबत अंतिम निर्णय मा.आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी,सोलापूर घेतील व पुढील निविदा प्रक्रीया नियमानुसार पुर्ण केली जाईल. |
| 23. | निविदेमधील सर्व साहित्याचा वाहतूक खर्च ठेकेदाराने करावयाचा आहे. कामगारांच्या मानधनाचा खर्च निविदाधारक यांनी स्वत: करावयाचा आहे. |
| 24. | निवडणूक अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी/ नगर अभियंता सोलापूर व त्यांनी प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांच्या लेखी मागणीनुसार आणि त्यांचे मार्गदर्शनाप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातीलकोणत्याही ठिकाणी व कोणत्याही वेळी मंडप, फर्निचर व इतरअनुषंगिक साहित्य पुरविणे बंधनकारक आहे. |
| 25. | निविदा मंजूर झालेल्या निविदाधारकाने मा.आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी,सोलापूर यांनी ठरवून दिलेल्या विहित नमुन्यात नियमानूसार अनुज्ञेय असलेल्या रकमेच्यास्टॅम्प पेपरवर करारनामाकरणे आवश्यक आहे. |
| 26. | यशस्वी निविदाधारकाला ई -निविदा मंजूर झाल्यानंतर 01 दिवसाच्या आत निविदेच्या अनुज्ञेय किंमतीच्या टक्केवारी नुसार राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट कार्यालयात जमा करणे बंधनकारक राहिल. निविदा कालावधी समाप्त झाल्यानंतर नियमानुसार निविदाधारकास सुरक्षा ठेवरक्कम परतकेली जाईल. |
| 27. | निविदेतील पुरवठा करणेसाठी आवश्यक असणारी यंत्रसामुग्री व मनुष्यबळ निविदा धारकाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. |
| 28. | ज्या निविदेमध्ये निश्चित दर दिलेले नसतील अथवा दिलेल्या दरांमध्ये संदिग्धता असेल अशी निविदा नाकारली जाण्यास पात्र ठरेल.जर अक्षरी व अंकी दरांमध्ये तफावत आढळल्यास दोन्हीपैकी जो दर कमी असेल तो दर विचारात घेतला जाईल. |

| | |
|---|---|
| 29. | निवडणूक याचिका, इतर शासकीय कारणामुळे निविदेमधील नमुद साहित्य गोडाऊनमध्ये राहून गेले असेल व तेकाढता येत नसेल किंवा निवडणूक याचिकेचा निकाल लागणे कामी जास्त कालावधी लागत असेल व सदरसाहित्याच्या कालावधीचे भाडे हे त्या साहित्याच्या खरेदी किमतीपेक्षा जास्त होत असेलतर अशा वेळी ठेकेदाराला भाडे अदा न करता सदर साहित्याचे चालू बाजार भावाची किंमत अदा करणेत येईल व सदरचे साहित्य कार्यालय ताब्यात घेईल व सदरचे साहित्य कार्यालयाच्या मालकीचे होईल.याबाबत मा.आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी,सोलापूर यांचा निर्णय अंतिम राहील. |
| 30. | ज्या दिवसाकरीता व प्रयोजना करीता निविदेतील साहित्य भाडे तत्वावर वापर करण्याचे पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे त्याच दिवसाचे भाडे अदाकरणेत येईल निविदेतील साहित्य लावणे, काढणे, यासाठी लागणाऱ्या कालावधीचे भाडे अदा करण्यात येणार नाही. त्या व्यतीरिक्त इतर दिवसाचे भाडे देय राहणार नाही. तसेच निवडणूक प्रक्रिया झाल्या नंतर निविदेतील साहित्य भाडे तत्वावर ज्या तारखेस घेऊन जाण्यास सांगितले असेल त्या तारखेस ठेकेदाराने निविदेतील साहित्य घेऊन गेले पाहिजे, त्या तारखेनंतरचे भाडे ठेकेदारांना दिले जाणार नाही. तसेच निविदेतील साहित्याच्या नुकसानीस हे कार्यालय जबाबदार नाही. |
| 31. | निविदाधारकाने निविदेतील साहित्याचा पुरवठा करत असताना कर्तव्य कालावधीमध्ये मनुष्यबळ अथवा मनुष्यबळास अपघातामुळे वा इतरकोणत्याही कारणास्तव आघात,दुखापत व नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही निविदाधारकाची राहील.सदरील बाबतीत कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई याकार्यालयातर्फे देण्यात येणार नाही. तसेच कामकरत असताना होणा-या मालमत्तेच्या हानी / नुकसानीची देखील जबाबदारी सर्वस्वी निविदाधारकाची राहील याची निविदाधारकाने नोंद घ्यावी. |
| 32. | निवडणूक निर्णय अधिकारी /सहायक निवडणूक निर्णय अधिकारी/ नगर अभियंता / सक्षम अधिकारी / नोडल अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे काम करावे लागेल. |
| 33. | निविदा धारकाने बॅरीकेटींग / पार्टीशनसाठी खोदलेले खड्डे किंवा इतर तोडफोडीची डागडूजी पुर्ववत करून देण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील. यासाठी स्वतंत्र रक्कम अदा केली जाणार नाही. |
| 34. | निविदाधारकांनी मंडप घातलेल्या ठिकाणी अग्नीशमन यंत्रणेची व्यवस्था करणे बंधनकारक राहील. |
| 35. | निविदाधारकांनी पुरविलेले साहित्याचा वापर एक महिन्याच्या कमी कालावधीसाठी झाल्यास त्यांचे भाडे हे दिवसाच्या दराप्रामणे देण्यात येईल. तसेच जर सदर होणारे भाडे हे माहिन्याच्या भाड्यापेक्षा जास्त होत असेल तर अशा परिस्थितीमध्ये महिन्याचेच भाडे अदा करण्यात येईल.एका महिन्यापेक्षा जास्त दिवसासाठी मंडप, फर्निचर व इतरअनुषंगिक साहित्य पुरविल्यास अशा परिस्थितीमध्ये एका महिन्याच्या पुढील प्रत्येक दिवसासाठी दुस-या दिवसापासून पुढील प्रत्येक दिवसासाठीचा प्रतिदिन दर (जो कमी असेल तो) देय राहील. |
| 36. | निविदाधारकाने निविदा भरताना नमुद केलेले मनुष्यबळ व त्यांच्या कार्यालयाचे ठिकाण प्रत्यक्षात भेट देवून तपासणेत येईल. |
| 37. | निविदाधारकांने पुरविलेले Fire Extinguisher सुस्थितीतले असावेत व निवडणूक प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत त्याची मुदत संपणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच Fire Extinguisher हाताळण्यासाठी एक तज्ञ, माहितगार कर्मचारी पुरविण्याची जबाबदारी संबधित निविदाधारकाची राहील. |
| 38. | मंडप उभारणीचे काम प्रत्यक्षात पुर्ण झाल्यानंतर व तसे मा.आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी / नोडल अधिकारी व नगर अभियंता विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रमाणित केल्यानंतरच देयक / भाड्याची गणना होईल. केवळ सामान जागेवर आणून ठेवले म्हणून त्या दिवसापासून भाडे गणना करता येणार नाही. तसेच कार्यादेशातील नमुद मुदत संपल्यानंतर अन्यथा निर्देश नसल्यास मंडप व अन्य साहित्य तात्काळ काढून घेणे बंधनकारक राहिल. तद्नंतरचे देयक अदा करण्यात येणार नाही. |
| 39. | या प्रयोजनार्थ ठेवण्यात आलेल्या मोजमाप पुस्तकामध्ये (Measurement Book) मध्ये दररोज नोंदी घेण्यात येतील व त्या नोंदीखाली नगर अभियंता कार्यालयाकडून नियुक्त नोडल अधिकारी,सहा.अधिकारी,तसेच संबधित पुरवठाधारक किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. त्या शिवाय देयके |

अदा करण्यात येणार नाहीत.

40. मतदान केंद्राबाहेरील मतदारांच्या सोयीसाठी उभारण्यात येणा-या मंडपाचा आकार किमान 15फुट X 15 फुट असावा , अशा भारत निवडणूक आयोगाच्या सूचना आहे. मात्र तो अवाजवी मोठा नसावा.

41. मा.आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी/ निवडणूक निर्णय अधिकारी/ सहा. निवडणूक निर्णय अधिकारी किंवा नगर अभियंता यांनी या प्रयोजनार्थ नेमलेला अधिकारी यांनी संपुर्ण तपशिल तसेच आवश्यक साहित्याचे परिमाण /संख्या नमूद असलेला कार्यादेश पुरवठाधारकास दिल्यानंतरच पुरवठाधारकाने काम सुरु करावयाचे/ साहित्य पुरवठा करावयाचे आहे.

42. पुरवठाधारकाने कार्यादेशात नमूद केलेल्या साहित्यापेक्षा जास्त साहित्य / सामग्रीचा पुरवठा करु नये. अतिरिक्त साहित्य हवे असल्यास त्याकरिता स्वतंत्र अतिरिक्त कार्यादेश देणे आवश्यक राहिल.

43. वेगवेगळ्या साहित्याकरिता/वस्तुंकरिता एकत्रित निविदा देताना, सर्व प्रकारच्या आवश्यक वस्तुंची संख्या/ परिमाण स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे, निविदाधारकाने/ पुरवठा धारकाने प्रत्येक वस्तूच्या/ साहित्याकरिता प्रति नग दर नमूद केल्यानंतर संबधित वस्तूच्या एकूण संख्येस संबधित वस्तूच्या प्रस्तावित दराने गुणून त्या वस्तुची/ बाबीची एकूण किंमत/ रक्कम काढण्यात येईल व सर्व वस्तूंच्या/ बाबींच्या एकूण( एकत्रित) किंमती/ रकमेवरून एल-1, एल-2 निश्चित करण्यात येतील.

उदा :खालील प्रमाणे साहित्य पुरवठा करण्यासाठी निविदा मागविण्यात आलेली असेल तर
खुर्ची- 500 नग
एसी- 50 नग
टेबल – 20 नग
आणि अ,ब व क असे तीन निविदाधारक असतील व त्यांना खालीलप्रमाणे प्रति नग किंमत नमूद केलेली असेल

| निविदाधारक | खुर्ची प्रति नग | एसी प्रति नग | टेबल प्रति नग |
|---|---|---|---|
| अ | 10 | 1 | 2 |
| ब | 7 | 20 | 10 |
| क | 5 | 10 | 8 |

तर खालील प्रमाणे एकत्रित किंमत गणना करुन एल-1, एल-2, एल-3 निश्चित करण्यात येईल.

| | निविदा धारकांनी नमूद केलेली किंमत ( एकूण नग X प्रति नग दर) (रु.) | | |
|---|---|---|---|
| वस्तू | निविदा धारक अ | निविदा धारक ब | निविदा धारक क |
| खुर्ची ( 500) | 500x10 =5000 | 500 x7= 3500 | 500x5= 2500 |
| एसी (50) | 50 x1= 50 | 50x20= 1000 | 50x10= 500 |
| टेबल ( 20) | 20x2 =40 | 20x10= 200 | 20x8=1600 |
| एकूण | 5090 | 4700 | 3160 |

वरील परिस्थितीत निविदा धारक ‘क’ हा एल-1 ठरेल.

उपरोक्त तक्त्यात नमुद केलेनुसार L1 काढणेत येणार असून आवश्यक साहित्याची संख्या व निविदाधारकाने नमुद केलेले साहित्याचे मुळ दर व सदर साहित्य वाहतुक करणेकामी लागणारी रक्कम व सर्व कर जीएसटीसह यांचा गुणाकार करून येणारी बेरीज अशा सर्व साहित्याची आलेल्या बेरजेवरून L1 काढणेत येणार याची पुरवठादाराने नोंद घ्यावी.

44. निवडणूकीनंतर निवडणूक याचिका दाखल झाल्यास आणि त्यामुळे (न्यायालयीन आदेश अथवा कोणत्याही

| | |
|---|---|
| | कारणास्तव) भाडे कराराने घेतलेल्या वस्तु/बाबी स्ट्रॉन्ग रुममध्ये अडकुन पडल्यास/ ठेवणे अनिवार्य ठरल्यास , सदर वस्तुच्या भाडे कराराच्या अंतिम दिनांकानंतर, सदर वस्तु/बाबीची बाजार भावाप्रमाणे (Current Market Rate) येणारी किंमत सबधित पुरवठाधारकास अदा करण्यात येईल. व तदनंतर संबधित पुरवठा धारकास त्या वस्तु/ बाबीच्या बाबत कोणताही दावा करता येणार नाही किंवा भाडे देण्याचा दावा करता येणार नाही. |
| 45. | काही निविदाधारक L1 (न्युनतम) येण्यासाठी कमी मागणी असलेल्या बाबींचे दर कमी केले जातात व जास्त मागणी असलेल्या बाबींचे दर जास्त भरले जातात त्यामुळे सरासरी (Avarage) दर न्युनतम येतात, असे झाल्यास निविदेतील निविदाधारकाने अशा प्रकारे भरलेले दर मंजूर करणे या कार्यालयास बंधनकारक राहणार नाही. सबब निविदाधारकांनी दर नमूद करताना वास्तविक बाजार दराशी सुसंगत दर नमूद करणे आवश्यक राहील. |
| 46. | निविदाधारकाच्या वतीने निविदेवर स्वाक्षरी करण्यास, निविदेसंबंधीच्या बैठकांना उपस्थित राहण्यास किंवा तांत्रिक व इतर माहिती पुरविण्यास एखाद्या व्यक्तीची नियुक्ती केली असल्यास त्यासंबंधी निविदाधारकांचे प्राधिकारपत्र (Bidder Power of Attorney) देणे आवश्यक राहील. |
| 47. | निविदाधारकांना निविदा सादर करताना निविदेमध्ये नमूद केलेल्या अटी, शर्ती व नियम या व्यतिरिक्त स्वत:ची कोणतीही अट निविदेमध्ये समाविष्ट करू नये. अशा पध्दतीच्या सशर्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. |
| 48. | मंजूर निविदाधारकांने मा.आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी / सहायक निवडणूक निर्णय अधिकारी / नगर अभियंता यांनी निर्देशित केलेल्या मागणी प्रमाणे व ठिकाणी साहित्याचा पुरवठा न केल्यास व इतर ठिकाणावरून साहित्याचा पुरवठा करून घ्यावा लागल्यास मंजूर निविदेपेक्षा जास्तीचा जो खर्च होईल, तो खर्च मंजूर निविदाधारक यांचेकडून वसूल करण्यात येईल. अन्यथा जिल्हाधिकारी सोलापूर हे जमीन महसूलांची थकबाकी व इतर स्थावर / जंगम मालमत्तेतून सदर खर्च वसुल करतील व अनामत रक्कम व डी.डी. जप्त करण्यात येईल. विहित वेळेत व मागणी नुसार शहरात निवडणूक विषयक कामांकरिता साहित्य उपलब्ध करून न दिल्यास लोकप्रतिनिधीत्व अधिनियम 1950 व 1951 व प्रचलित कायद्यामधील तरतुदीनुसार मंजूर निविदाधारक शिक्षेस पात्र राहिल. |
| 49. | ई - निविदा संदर्भात केंद्र व राज्य शासनाव्दारे व निवडणूक आयोग यांचेकडून वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश, परिपत्रकमध्ये निर्देशित केलेल्या सर्व अटी, शर्ती व नियम लागु राहतील. |
| 50. | निविदाधारकाने सादर केलेले दर हे वास्तव, वस्तुनिष्ठ, बाजार किमतीनुसार सुसंगत असावेत. सदर दराबाबत संदिग्धता निर्माण झाल्यास अंतिम निर्णय मा.आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी, सोलापूर यांचा राहिल. |
| 51. | पुरवठाधारकाने कार्यादेशात नमूद केलेले साहित्याचे (नग) हे सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 असून मा.आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी / सहायक निवडणूक निर्णय अधिकारी /सक्षम अधिकारी / नगर अभियंता यांना आवश्यतेनुसार पुरवठा करणे बंधनकारक राहिल. पुरवठा आदेशामध्ये नमुद साहित्यापेक्षा जास्त साहित्य लागत असल्यास त्याप्रमाणे पुरवठा आदेश देणेत येईल. व पुरवठा आदेश दिल्यानंतरचे सदरचे साहित्य निविदेमध्ये नमुद दराने पुरवठा बंधनकारक राहिल. जेवढे साहित्य पुरवठा करून घेतलेले आहे. तेवढ्याच साहित्याचे देयक अदा करणेत येईल. |
| 52. | निविदाधारक अथवा निविदाधारकांच्या घरातील कुठलाही व्यक्ती राजकीय पक्षाशी संबंधित नसावा.तसेच निविदाधारक कोणत्याही राजकीय पक्षाचे पद भुषविले नसल्याबाबत सद्यस्थितीत कोणत्याही राजकीय पक्षाचा पदाधिकारी नसल्याबाबत व त्याचे विरूध्द कोणताही गुन्हा दाखल नसल्याबाबत 100 रूपयेच्या स्टॅम्प पेपरवर स्वतंत्र प्रतिज्ञापत्र (कार्यकारी दंडाधिकारी किंवा नोटरी करून देणे आवश्यक आहे. तसेच भविष्यकाळात निवडणूकीच्या कालावधीत त्याला तशी नेमणूक स्विकारता येणार नाही. याबाबत त्यांने तसे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच निविदाधारक पुढाऱ्याचा हितचिंतक किंवा पाठीराखा म्हणून ज्ञात नसावा. |

| | |
|---|---|
| | तथापि असे असल्याचे निदर्शनास आल्यास कोणतेही कारण न देता सदर निविदाधारकाची निविदा रद्द करणेत येईल. |
| 53. | निविदेमध्ये नमुद साहित्याशिवाय इतर अनुषंगिक साहित्याचा पुरवठा करणेबाबत पुरवठा आदेश दिलेस सदर साहित्याचा दर चालू बाजार भाव किंवा DSR च्या दरापेक्षा जे कमी असेल त्या प्रमाणे दर अदा करणेत येईल. |
| 54. | निविदाधारकाकडे पुरेशा प्रमाणात साहित्य उपलब्ध नसल्यास त्याला त्रयस्थ व्यक्ती/ संस्थेकडून भाड्याने साहित्य घ्यावे लागल्यास निविदेत नमुद केलेल्या दराप्रमाणे पुरवठादारास रक्कम अदा करण्यात येईल. तसेच याबाबत निविदाधारकाने ज्यांच्याकडून सदर साहित्याची तजवीज केली आहे, त्या व्यक्ती / संस्थेस कोणतीही रक्कम या कार्यालयाकडून अदा होणार नाही. |
| 55. | कामकाजाची आवश्यकता विचारात घेऊन निविदेच्या अंदाजित कामकाजामध्ये वाढ किंवा घट झाल्यास वस्तुस्थितीनुसार देयकाची रक्कम तपासणी अंती कमी अधिक होऊ शकते. अशावेळी कामाच्या आदेशामध्ये वाढ किंवा घट करण्याबाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. |
| 56. | निविदाधारकाने नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांकडून कामकाजासंबंधी आदर्श आचार संहितेचे पालन करणे आवश्यक राहिल. सदरबाबत नेमणूक केलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्यांकडून नियमबाह्य, बेशिस्त वर्तन झाल्याचे निदर्शनास आल्यास व काही अघटीत घटना घडल्यास याबाबत होणाऱ्या परिणामांची संपुर्ण जबाबदारी निविदाधारकाची राहिल. |
| 57. | निविदेतील दर मंजूर झाले नंतरच्या कालावधीत शासनाकडून कोणतेही बाबींचे दर वाढविण्यात आल्यास किंवा बाजारभावानुसार असणाऱ्या किंमतीत वाढ झाल्यास कार्यालयाकडून कोणतीही अतिरिक्त दर वाढ मंजूर केली जाणार नाही. सबब निविदेत मंजूर असलेले दर हे अंतिम समजले जातील याची नोंद घ्यावी. तसेच मा. निवडणूक आयोगाच्या मान्यताप्राप्त नमुन्याप्रमाणे साहित्य पुरवणे पुरवठादारास बंधनकारक राहील. |
| 58. | निविदाधारकाने कार्यालयाकडे जमा केलेली अनामत रक्कम (राष्ट्रीयकृत बँकेची धनाकर्ष) कराराचा कालावधी संपूष्टात आल्यानंतर प्राप्त करून घेण्यासाठी कार्यालयाकडे लेखी अर्ज करणे आवश्यक राहील. सदर अनामत रक्कम परत करताना पुरवठादाराने निविदेतील अटी व शर्तीनुसार सर्व बाबींची पुर्तताझालेची कार्यालयाने खात्री केल्यानंतर संबंधित पुरवठाधारकास त्याची अनामत रक्कम परत करण्यात येईल. |
| 59. | देयकाबाबत कार्यालायाच्या विरोधात उपोषण / आत्मदहन करण्याचा निविदाधारक व त्यांच्याशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला अधिकार राहणार नाही. अशा प्रकारे केल्या जाणाऱ्या उपोषणास व आत्मदहनास संबंधित कार्यालय / शासन जबाबदार राहणार नाही याची पुरवठाधारकाने नोंद घ्यावी. |
| 60. | मंजूर निविदाधारकाने 18 वर्षा खालील कामगार सदर कामाकरीता ठेवू नये. |
| 61. | मंजूर निविदाधारकाचे/फर्मचे स्थावर मालमत्ते विषयी विवरणपत्र (स्थावर मालमत्ते च्या मालकी हक्काविषयी अधिकृत कागदपत्रे जोडावी उदा. 7/12, 8अ, असेसमेंट नक्कल चालु वर्षाची) निविदाधारकाच्या कुटुंबातील व्यक्तीचे असल्यास त्यांचे नाहरकत प्रमाणपत्र. |
| 62. | प्रस्तुत निविदेची अंदाजित रक्कम व निवडणूकी करीता लागणाऱ्या अंदाजित वस्तू/साहित्य/नग हे सोलापूर महानगरपालिका निवडणूक 2025 च्या अनुषंगाने देण्यात आलेली आहेत.त्यामध्ये वाढ व घट करण्याचे अधिकार मा.आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी सोलापूर यांनी राखुन ठेवलेले आहे. |
| 63. | निविदेतील कोणत्याही अटी अथवा शर्तीमधील संपूर्ण अथवा कोणत्याही भागाचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित ठेकेदार प्रचलित नियमानुसार कारवाईस पात्र राहील. |
| 64. | सदर पुरवठा हे निवडणुकी संदर्भात व कालमर्यादेचे असल्याने यापूर्वी निवडणुकीसंबंधी पुरवठा केलेले स्थानिक पुरवठादार असल्यास प्राधान्य देण्यात येईल. |
| 65. | अनुदान उपलब्धतेनुसार दयक अदा करण्यात येईल. |

III) **लिफाफा क्र.2 निविदेचा व्यापारी लिफाफा :-**

(व्यापारी लिफाफ्यातील दरतक्ता .xls मध्ये तयार करूनwww.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)

1.सशर्त निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

2. ज्या निविदेत निश्चित दर दिलेले नसतील अथवा दिलेल्या दरांमध्ये संदिग्धता असेल अशी निविदा नाकारली जाण्यास पात्र ठरेल. जर अक्षरी व अंकी दरांमध्ये तफावत असल्यास दोन्हीपैकी जो दर कमी असेल तो दर विचारात घेतला जाईल.

3.निविदाधारकाने दर नमुद करताना वस्तू व सेवासाठीची किंमत / खर्च व त्यासाठी भरावे लागणारे वेगवेगळे कर, वाहतूक खर्च हे स्वतंत्रपणे नमूद करुन त्याची एकूण होणारी रक्कम नमूद करावी.

4.निविदाधारकाने सादर केलेले निविदा कार्यारंभ आदेश दिलेल्या दिनांकापासून 01 वर्षापर्यंत स्वीकृतीस पात्र राहतील.

IV) **सुरक्षा अनामत रक्कम (Security Deposit) :-**

ज्या निविदाधारकाची निविदा मंजूर झाल्यांनतर 01 दिवसाच्या आत निविदेच्या 3 % (तीन टक्के) सुरक्षा अनामत रक्कम राष्ट्रीयकृत बॅकेच्या धनाकर्षाने भरणे बंधनकारक राहिल. (या रक्कमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही) जर निविदाधारकाने निविदा स्वीकृतीच्या दिनांकापासून 01 दिवसाचे आत सुरक्षा अनामत रकमेचा भरणा केला नाही तर त्याची निविदा रद्द करण्यात येऊन त्यांचे निविदेसोबत भरणा केलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

V) **करारनामा (Agreement) :-**

मंजूर निविदाधारकास मा.आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी, सोलापूर यांचेसोबत नियमानुसार अनुज्ञेय रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल. करारनाम्यामध्ये वरील अटी /शर्तीचा समावेश राहील. तथापि,करारनामा करतेवेळी या अटीमध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार मा.आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे.

| -: निविदा लिफाफा क्र.1:- | | | |
|---|---|---|---|
| | जे निविदाधारक लिफाफा क्र.1 मधील तांत्रिक बाबींची पूर्तता करतील त्यांचाच लिफाफा क्र.2 उघडण्यात येईल. खालील सर्व कागदपत्रे स्वसाक्षांकीत करून तांत्रिक लिफाफा-1 मध्ये अपलोड करावेत. | | |
| अ.क्र. | तपशिल | | पा.क्र. पासून ते पर्यंत |
| 1 | Form Fee (निविदा खरेदी फी) | :- | |
| | Earnist Money Deposit (EMD) पावती | :- | |
| | Name of Bank | :- | |
| 2 | Name of Bidder & Address | :- | |
| 3 | Details of Institute / Company / Firm | :- | |
| | Registration Details | :- | |
| | Place & Address of Business | :- | |
| 4 | Contact Details | :- | |
| | A) Phone No. Landline no. | :- | |
| | B) Mobile No. | :- | |
| | C) E-mail ID | :- | |
| 5 | Examtion of (EMD) Certificate -Uddyam Certificate ect. | | |
| 6 | Shop Act license (Renew) | | |
| 7 | Income Tax Pan Card No and Adhar card. | | |
| 8 | Income Tax Return Statement ( last 1 year) | | |
| 9 | Professional Tax Clearance Certificate / Challan | | |
| 10 | GST Registration Certificate & Registration No. | :- | |
| 11 | GST payment Details/Clearance Certificate GSTR- 3B (Current Year) | :- | |
| 12 | Certificate of being not included in a blacklist (Non -Defaulter) | :- | |
| 13 | Agreement for acceptance of All Terms and Conditions mentioned in tender on Rs. 100 stamp paper | | |
| 14 | It is Compulsary experience of satisfactorily completing one or more election related work. Also it is necessary to attach the experience certificate given by the Competent Authority for supply of materials on hire basis to Government / Semi-Government / Central Government Offices in the said tender. | :- | |
| 15 | Turnover certificate of the previous year ( 2020-21, 2021-22, 2022-23, 2023-24 & 2024-25) for the financial year, however considering the outbreak of Covid-19 in the financial year 2020-21 and 2021-22 The average turnover for any three out of five years must be at least 30% | :- | |

| | | | |
|---|---|---|---|
| | of the tender values. A certificate from a Chartered Accountant must also be attached. | | |
| 16 | It is necessary to specify in detail the availability of own machinery and manpower for the specified work in the tender. | :- | |
| 17 | Regarding the fact that the tenderer has not held the position of any political party, is not currently an office bearer of any political party and has not filed or pending any criminal case against him/her Affidavit on stamp paper of Rs.100 (Executive Magistrate or Notary) | | |
| 18 | Self-attested copies of all documents and registration certificates submitted along with tenders | | |

ठिकाण :- ------

दिनांक : / /2025

निविदाधारकाची सही :- -----------------------------

निविदाधारकाची संपूर्ण नाव :- -----------------------------

फर्म / संस्थेचे नाव व पत्ता :- -----------------------------

मोबाईल नंबर :- -----------------------------

## निविदाधारकांनी निविदेसोबत सादर करावयाचे हमीपत्र

मी / आम्ही निविदेच्या अटी व शर्तीचे काळजीपुर्वक वाचन केले असून त्या सर्व अटी व शर्ती समजून घेतल्या आहेत ते मान्य आहेत. त्यानुसार तांत्रिक निविदा अर्ज "अ" (तांत्रिक लिफाफा) व "ब" (व्यापारी लिफाफा) सोबत परिपुर्ण भरून दिला आहे. तसेच मी / आम्ही या अटी व शर्तीना बांधील राहून सोलापूर महानगरपालिका ,सोलापूर यांनी दिलेल्या कार्यादेशान्वये सोलापूर शहराकरिता निवडणूक विषयक कामांसाठी लागणाऱ्या निविदेतील नमुद साहित्य पुरवठा करणेस बांधील राहू.

वरील मजकुर माझे माहितीप्रमाणे खरा व सत्य आहे. मी आवश्यकतेप्रमाणे सेवा न पुरविल्यास निविदेत नमुद केलेल्या अटी व शर्तीनुसार दंडनीय कारवाईस पात्र राहिल. तसेच मी, वरीलपैकी कोणत्याही अटी अथवा शर्तीमधील संपूर्ण किंवा कोणत्याही भागाचा भंग केल्यास / तसे निदर्शनास आल्यास लोकप्रतिनिधीत्व अधिनियम 1950 व लोकप्रधिनिधीत्व अधिनियम 1951 आणि भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार तसेच प्रचलित कायद्यानुसार मी शिक्षेस पात्र राहिल. सदर मजकुर मी आज दि. / /2025 रोजी मुक्कमी प्रमाणित केलेला आहे.

दिनांक :-

स्थळ :- निविदाधारकाचे नाव , सही व शिक्का

**<u>प्रपत्र-1</u>**

**<u>स्वघोषणापत्र</u>**

मी / आम्ही खालील सही करणार ---------------------------- वय ---------- रा------------ घोषणापत्र लिहून देतो/देते की, सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 च्या अनुषंगाने ----------------- हे कामकाज पूर्ण करण्याकरीता प्रसिध्द करण्यात आलेल्या ई - निविदा सुचना दि.------------------ अन्वये आम्ही सादर केलेल्या ई - निविदेमध्ये नमूदकेलेली माहिती संपूर्णपणे खरी व बरोबर असून, सदर माहितीच्या पृष्टयर्थ मी / आम्ही ई - निविदेसोबत सादर केलेली कागदपत्रे खरी व बरोबर आहेत.

मी / आम्ही असेही घोषीत करतो/करते की, आमची फर्म मे. ------------------------------------------------ शासकीय / निमशासकीय आस्थापना/ संस्थाकडून कधीही निविदाधारकाच्या काळ्या यादीत समाविष्ट करण्यात आलेली नाही.

उपरोक्त नमूद माहिती चुकीची असल्यास अथवा खोटी आढळून आल्यास ई - निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही स्तरावर मी / आम्ही भा.दं.वि.1860 च्या कलम 199,200 अन्वये कायदेशीर अथवा दंडनीय कारवाईस पात्र ठरू तसेच आम्ही सादर केलेली निविदा अपात्र ठरेल याची आम्हास जाणीव आहे.

दिनांक :-

स्थळ :-

निविदाधारकाची सही :- ----------------------------

निविदाधारकाची संपूर्ण नाव :- ----------------------------

फर्म / संस्थेचे नाव व पत्ता :- ----------------------------

मोबाईल नंबर :- ----------------------------

## **प्रपत्र-2**

मागीलपाचवर्षाचे (सन 2020-21, 2021-22, 2022-23, 2023-24 व 2024-25) ) याआर्थिकवर्षातीलउलाढालप्रमाणपत्र, तथापिसन 2020-21 वसन 2021-22 या आर्थिक वर्षातील कोविड 19 च्या प्रादुर्भावाचा विचार करून मागील पाच वर्षापैकी कोणत्याही तीन वर्षाची सरासरी उलाढाल ही निविदा मुल्याच्या किमान 30% (तीस टक्के) असणे अनिवार्य आहे. तसे सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे

| आथिक वर्ष | संस्थेची उलाढाल रक्कम रूपये |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| दिनांक :- | सनदी लेखापाल यांची स्वाक्षरी व शिक्का |

## **प्रपत्र-3**

मागील वर्षाचे आयकर विवरणपत्र (Income Tax Return)

| अ.क्र. | आथिक वर्ष | संस्थेची करपात्र भरणा केलेली रक्कम (रूपये) |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | ठिकाण :-<br>दिनांक : / /2025 | निविदाधारकाची सही :- -----------------------------<br>निविदाधारकाची संपूर्ण नाव :- -----------------------------<br>फर्म / संस्थेचे नाव व पत्ता :- -----------------------------<br>मोबाईल नंबर :- ----------------------------- |

**<u>प्रपत्र-4</u>**

निवडणूक विषयक सदर कामकाजाचे एक किंवा अधिक वेळा समाधानकारक काम पुर्ण केल्याचा **अनुभव असणे** आवश्यक आहे. तसेच शासकीय /निमशासकीय /केंद्र शासकीय कार्यालयांना सदर निविदेमध्ये नमुद साहित्य भाडे तत्वावर पुरवठा केल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

निविदाधारकाची सही :- -----------------------------

निविदाधारकाची संपूर्ण नाव :- -----------------------------

फर्म / संस्थेचे नाव व पत्ता :- -----------------------------

मोबाईल नंबर :- -----------------------------

ठिकाण :- ------

दिनांक : / /2025

| **प्रपत्र -5** | | | |
|---|---|---|---|
| निविदाधारक यांचेकडे निविदेमधील साहित्य मागणीनुसार पुरवठा करण्यासाठी उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाची माहिती किंवा अन्यमार्गाने उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाबाबतची माहिती. | | | |
| अ.क्र. | सध्यस्थितीत उपलब्ध मनुष्यबळाची माहिती / संख्या | अन्य मार्गाने उपलब्ध होणारे मनुष्यबळाची माहिती. | निविदेमध्ये नमुद उपलब्ध साहित्याची (संख्या) |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

ठिकाण :- ------

दिनांक : / /2025

निविदाधारकाची सही :- -----------------------------

निविदाधारकाची संपूर्ण नाव :- -----------------------------

फर्म / संस्थेचे नाव व पत्ता :- -----------------------------

मोबाईल नंबर :- -----------------------------

**<u>प्रपत्र -6</u>**

**निविदाधारकांनी निविदेसोबत सादर करावयाचे Non Defaulter Certificate प्रमाणपत्र**

मी / आम्ही निविदेच्या अटी व शर्तीचे काळजीपुर्वक वाचन केले असून सर्व समजून घेतल्या आहेत व त्यानुसार मला / आम्हाला /आमच्या संस्थेस निविदेधील नमुद साहित्य पुरवठा कामासाठी कोणत्याही प्रकारची आर्थिक / दंडात्मक कारवाई / शास्ती कोणत्याही शासकीय कार्यालयार्फत झालेली नाही अथवा काळ्या यादीत समाविष्ट करण्यात आलेली नाही.

वरील मजकुर माझे माहितीप्रमाणे खरा व सत्य आहे. मी आवश्यकतेप्रमाणे सेवा न पुरविल्यास अथवा भविष्यात सदरबाबत माहिती उघड झाल्यास निविदेत नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार दंडनीय कारवाईस तसेच मी. भा.द.वि.वि.कलम 199 व 200 प्रमाणे व लोकप्रधिनिधीत्व अधिनियम, 1950 व लोकप्रतिनिधीत्व अधिनियम 1951 आणि मा. भारत निवडणूक आयोगाचे निर्देशानुसार तसेच प्रचलित कायद्यानुसार मी शिक्षेस पात्र राहिल.

सदर मजकुर मी आज दि. / /2025 रोजी मुक्कामी प्रमाणित केलेला आहे.

ठिकाण :- ------
दिनांक : / /2025

निविदाधारकाची सही :- -----------------------------
निविदाधारकाची संपूर्ण नाव :- -----------------------------
फर्म / संस्थेचे नाव व पत्ता :- -----------------------------
मोबाईल नंबर :- -----------------------------

| दराचा लिफाफा क्रमांक 2 (व्यावसायिक लिफाफा) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **साहित्याचा तपशिल** | **अंदाजित आवश्यक नग (संख्या)** | **नग/प्रमाण** | **पहिल्या दिवसासाठीचा दर रूपये** | **सर्व कर, वाहतुक खर्च इ.सह** | **एकुण बेरीज** |
| 01. | पत्रा शेड | 100000 | प्रती स्के. मीटर | | | |
| 02. | पाण्याचा ड्रम (500 लिटर) | 220 | प्रती 1 नग | | | |
| 03. | मंडप /पेंडॉल (वॉटर प्रुफ) | 100000 | प्रती स्के. मीटर | | | |
| 04. | मंडप /पेंडॉल (साधा) | 100000 | प्रती स्के. मीटर | | | |
| 05. | ज्युट कार्पेट | 25000 | प्रती स्के. मीटर | | | |
| 06. | टेबल कव्हर | 5500 | प्रती स्के. मीटर | | | |
| 07. | पार्टीशन कापडी (7 फुट उंच) | 12000 | प्रती स्के. मीटर | | | |
| 08. | सतरंजी (9 x 18 फुट) | 150 | प्रती दिन भाडे | | | |
| 09. | कापडी सतरंजी (9 x 12 फुट) | 150 | प्रती दिन भाडे | | | |
| 10. | चटई मॅट | 7500 | प्रती स्के. मीटर | | | |
| 11. | कारपेट | 7500 | प्रती स्के. मीटर | | | |
| 12. | कापडी मंडप जीआय शीट पत्राशेड सह | 100000 | प्रती स्के. मीटर | | | |
| 13. | टेबल (2 X 4) फुट | 2000 | प्रती 1 नग | | | |
| 14. | टेबल (6 X 2) फुट | 2000 | प्रती 1 नग | | | |
| 15. | फोल्डींग टेंबल (4 X 2) फुट | 2000 | प्रती नग | | | |
| 16. | फोल्डींग टेंबल (4 X 2) फुट फ्रिलसह | 2000 | प्रती नग | | | |
| 17. | खुर्ची (प्लास्टिक) with arm | 35000 | प्रती 1 नग | | | |
| 18. | खुर्ची (प्लास्टिक) without arm | 35000 | प्रती 1 नग | | | |
| 19. | ड्रॉवर टेबल | 150 | प्रती 1 नग | | | |
| 20. | गादी, बेडशीट, चादर / ब्लँकेट व पीलो (कव्हर सह) | 2500 | प्रती 1 नग | | | |
| 21. | सोफा थ्री सीटर | 120 | प्रती 1 नग | | | |
| 22. | डनलोप खुर्ची, एक्सीकेटीव्ह खुर्ची | 200 | प्रती 1 नग | | | |
| 23. | लाकडी स्टेज 2 फुट उंच (15x20) | 50 | प्रती स्के. फुट | | | |
| 24. | डायस 1 फुट उंच (15x20) | 50 | प्रती स्के. फुट | | | |
| 25. | अपंगासाठी लाकडी रॅम्प (1.20 मीटर रूंद कमीत कमी) | 1000 | प्रती स्के. मीटर | | | |
| 26. | लाकडी पायरी (1.20 मीटर रूंद कमीत कमी) | 100 | प्रती नग | | | |
| 27. | लोखंडी पायरी (1.20 मीटर रूंद कमीत कमी) | 100 | प्रती नग | | | |
| 28. | एक्सिकेटीव्ह टेबल फ्रिलसह | 50 | प्रती नग | | | |
| 29. | मोबाईल टॉयलेट साधा | 500 | प्रती नग | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 30. | बल्ली / बांबु बॅरीकेटींग | 6000 | प्रती रनिंग मिटर | | | |
| 31. | बॅरीकेटींग (3 फुट पत्रा व त्यावर 3 फुट जाळी) | 3000 | प्रती रनिंग मिटर | | | |
| 32. | लोखंडी बॅरीकेटींग | 1600 | प्रती रनिंग मिटर | | | |
| 33. | सीजीआय शीट पार्टिशन (7 फुट उंच) पन्हाळी पत्रा | 2000 | प्रती रनिंग मिटर | | | |
| 34. | प्लायवुड (04 मि.मि.) □□□ | 2400 | प्रती स्के. फुट | | | |
| 35. | प्लायवुड (06 मि.मि.) | 1200 | प्रती स्के. फुट | | | |
| 36. | प्लायवुड (08 मि.मि.) | 800 | प्रती स्के. फुट | | | |
| 37. | प्लायवुड (12 मि.मि.) | 600 | प्रती स्के. फुट | | | |
| 38. | प्लायवुड (24 मि.मि.) | 400 | प्रती स्के. फुट | | | |
| 39. | पत्राशीट पार्टीशन | 2500 | प्रती स्के. मीटर | | | |
| 40. | चेन लिंक जाळी पार्टीशन 7 फुट उंच | 2400 | प्रती स्के. मीटर | | | |

निविदाधारकाने दर नमुद करताना वस्तू व सेवासाठीची किंमत / खर्च व त्यासाठी भरावे लागणारे वेगवेगळे कर, वाहतूक खर्च हे स्वतंत्रपणे नमूद करुन त्याची एकूण होणारी रक्कम नमूद करावी. वरील सर्व तक्त्यामधील सर्व साहित्याचे दर भरणे आवश्यक आहे. त्या सर्व साहित्याची एकूण बेरीज करून L1 काढणेत येईल.( आवश्यक साहित्याची संख्या व निविदाधारकाने नमुद केलेले साहित्याचे मुळ दर व सदर साहित्य वाहतुक करणेकामी लागणारी रक्कम व सर्व कर जीएसटीसह यांचा गुणाकार करून येणारी बेरीज अशा सर्व साहित्याची आलेल्या बेरजेवरून L1 काढणेत येईल.)

(उपरोक्त नमुद करण्यात येणाऱ्या दरामध्ये प्रत्यक्ष काम करणाऱ्या व्यक्तीच्या शुल्कासहित समाविष्ट असावे. साहित्य ने -आण (ट्रान्सपोर्ट) करणेसाठी वेगळे शुल्क दिले जाणार नाहीत. निविदेतील दर सर्व करासहीत-जीएसटीसह द्यावेत.)

निविदाधारकांनी पुरविलेले साहित्या चा वापर एक महिन्याच्या कमी कालावधीसाठी झाल्यास त्यांचे भाडे हे दिवसाच्या दराप्रामणे देण्यात येईल. तसेच जर सदर होणारे भाडे हे माहिन्याच्या भाड्यापेक्षा जास्त होत असेल तर अशा परिस्थितीमध्ये महिन्याचेच भाडे अदा करण्यात येईल.एका महिन्यापेक्षा जास्त दिवसासाठी साहित्य भाडे तत्वावर पुरविल्यास अशा परिस्थितीमध्ये एका महिन्याच्या पुढील प्रत्येक दिवसासाठी दुस-या दिवसापासून पुढील प्रत्येक दिवसासाठीचा प्रतिदिन दर देय (जो कमी असेल तो) राहील.

ठिकाण :- सोलापूर
दिनांक : / /2025

निविदाधारकाची सही :- -----------------------------
निविदाधारकाची संपूर्ण नाव :- -----------------------------
फर्म / संस्थेचे नाव व पत्ता :- -----------------------------
मोबाईल नंबर :- -----------------------------